# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ६१० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२३ / ०९ / २०१६

**१) अवैधरित्या जनावरांना कोंबुन निर्दयतेची वागणुक देवून जनावरे खरेदी विक्रीचा परवाना न बाळगता मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २२ / ०९ / २०१६ रोजी ०५.३० वा. दर. यातील फिर्यादी हे शहरात पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी हा आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये कोणत्याही प्रकारचा जनावरे खरेदी विक्रीचा परवाना न बाळगता १३ हेले, २ म्हशी एकुण १५ जनावरे किमती ८०,००० / —रु. निर्दयतेने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(ड) प्राणी निर्दयतेने वागविण्याचा कायदा सहकलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) युवकाचा मृत्यु . :—**

दिंनाक. २२ / ०९ / २०१६ चे ०७.०० वा. पुर्वी. यातील मृतक गोलु माकचंद गाळे वय २५ वर्ष, रा. मलेरी पो. स्टे. केसली जि. सागर (मध्यप्रदेश) हा गणेशपुर येथे असलेल्या मेल्यामध्ये काम करित होता मृतक हा जास्त प्रमाणात दारु पिण्याच्या सवयीचा होता. मृतक हा चैतन्य मैदानाचे मागील गेटजवळ असलेल्या नालीचे पाण्यात मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी सौ. अनिता अमित सिंग वय ४० वर्ष, रा. अनवरा जि. सोनभद्रा पो. स्टे. आवळी (यु.पी) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिदे पो. स्टे. भंडारा हे करित आहेत.

**३) जास्त दारुचे सेवनाने इसमाचा मृत्यु. :—**

दिंनाक. २२ / ०९ / २०१६ रोजी ०७.३० वा. दर. यातील फिर्यादी देशी दारु भट्टी दुकानावर काम करणारा हेंमत खंडारे यांनी फोन व्दारे माहीती दिली की १ इसम हा जास्त दारु पिवुन आपल्या भट्टी समोर झोपला आहे. त्याचे अंगावर पाणी टाकुण त्यास उठवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याने काही हालचाल न केल्याने तो मृतक धरमदास लक्ष्मण चवरे वय ६५ वर्ष, रा. कान्द्री पो. स्टे आंधळगाव हा मृत अवस्थेत आढळुन आल्याने फिर्यादी भास्कर कुंभराव सोनवाने वय ३२ वर्ष, रा. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करित आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान युवतीचा मृत्यु . :—**

दिंनाक. २० / ०९ / २०१६ रोजी १५.१५ वा. दर. यातील मृतक कु. स्मृती अनील सपाटे वय २३ वर्ष, रा. धोप हिची प्रकृती अचानक बिघडल्याने तिला औषधोपचाराकरीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आकस्मीत विभागात नेले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ०० / १६ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे ला प्राप्त झाल्याने पोस्टे आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेकी पो.स्टे. आंधळगाव हे करित आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.